मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून पिंपरी-चिंचवडच्या चारही आमदारांचे अभिनंदन..!

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत मिळालेल्या भरघोस यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील चारही आमदारांचे अभिनंदन केले.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत मिळालेल्या भरघोस यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील चारही आमदारांचे शनिवारी अभिनंदन केले. पुणे येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असताना त्यांनी आमदार महेशदादा लांडगे, आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार अमित गोरखे आणि आमदार



उमाताई खापरे यांचे कौतुक केले.

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, "तुम्ही सर्वांनी एकत्रितपणे अत्यंत चांगले यश संपादन केले आहे. मतदारांनी दाखवलेला विश्वास आपल्या कार्यातून सार्थ ठरवा." तसेच पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

"जोमाने कामाला लागा, जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्या आणि शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करा," असा संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चारही आमदारांना दिला. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे आगामी काळात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

---

# अनेक अपघातानंतरही चालकांचा बेशिस्तपणा कायम

**रस्त्यावर दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत.**

**पिंपरी | प्रतिनिधी**


चिखली परिसराकडे जाणारा चिखली - आकुर्डी या मुख्य रस्त्याबरोबर देहू - आळंदी रस्त्यावर दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. अनेकदा किरकोळ अन् गंभीर अपघात घडल्यानंतरही चालकांचा बेशिस्तपणा थांबलेला नाही. वाहतूक पोलिस असतानाही वाहनचालक त्यांच्याशी हुज्जत घालतात मोई फाटा डायमंड चौक याठिकाणी ज्या पध्दतीने वाहतूक कोंडी कमी केली तशीच या चौकात होणे अपेक्षित आहे. त्यानुसार वाहतूक पोलिस,



महापालिका प्रशासन आणि स्थानिकचे राजकीय पदाधिकारी यांच्या संयुक्त नियोजनानुसार ही समस्या मार्गी लावणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

चिखली परिसराकडे जाण्यासाठी चिखली - आकुर्डी; तर मोशी आणि देहूकडून येण्यासाठी देहू - आळंदी हा मुख्य रस्ता आहे. मात्र, या रस्त्यावर दररोजच तास न तास वाहतूक कोंडी झालेली पाहावयास मिळते. रुंदीकरणासाठी चिखली - आकुर्डी रस्त्यावरील अतिक्रमणे सहा महिन्यांपूर्वीच हटविण्यात आली. मात्र, अद्यापही रस्त्याचे काम हाती घेण्यात आले नाही.

**(उर्वरित पान - 2 वर)**



> **सकाळच्या वेळेत मुलांना शाळेत सोडवायला जाताना जीव मुठीत घेऊन गाडी चालवावी लागते, वाहतूक कोंडी, विरूध्द दिशेने येणाऱ्या गाड्या यामुळे अपघाताची भिती वाटते. कधी-कधी मुलांना शाळेत वेळेवर पोहचवताना उशिर होतो.**
> **- प्रतिभा चौधरी**

> **डायमंड सर्कल मोई फाटा पूर्णपणे वाहतूक कोंडीमुक्त उभा राहून केला. काही ठिकाणी उपाययोजना करताना काही अडथळे आहेत. त्यावर काम करणे सुरु आहेत.**
> **- रामचंद्र घाडगे, वरिष्ठ निरीक्षक, तळवडे वाहतूक विभाग**

# महापालिका सभागृहात डॉक्टर, वकील, अभियंते अन् शिक्षक

**दहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले नगरसेवक सर्वाधिक**



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची सूत्रे नव्या १२८ नगरसेवकांच्या हाती आली आहेत. यामध्ये चौथी ते सातवीपर्यंत शिकलेले १४, तर आठवी ते नववीपर्यंत शिक्षण घेतलेले १८ नगरसेवक आहेत.

**(उर्वरित पान - 2 वर)**

### महापालिका निवडणूक : नगरसेवकांचे शैक्षणिक चित्र


- » शैक्षणिक पात्रता संख्या
- » एकूण नगरसेवक : १२८
- » ४ थी ते ७ वी : १४
- » ८ वी ते ९ वी : १८
- » १० वी पास : २७
- » १२ वी पास : २१
- » पदवीधर (बीए/ बीकॉम/ बीएस्सी) : ३३
- » पदव्युत्तर (एमए/ एमकॉम/ एमएससी/ एमबीए/ एमसीए) : ८
- » व्यावसायिक पदवी (डॉक्टर, वकील, अभियंते, शिक्षक) : ७
- » दहावी ते पदवीधर नगरसेवकांची संख्या सर्वाधिक (८१)

# ‘नोटा’मुळे मातब्बर उमेदवारांचा सुफडा साफ

## महापालिका निवडणुकीत विविध पक्षांच्या मातब्बर उमेदवारांना ‘नोटा’ (या पैकी कोणीही नाही) मतांचा मोठा फटका बसला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीत विविध पक्षांच्या मातब्बर उमेदवारांना ‘नोटा’ (या पैकी कोणीही नाही) मतांचा मोठा फटका बसला आहे. विजयासाठी आवश्यक असलेली मते नोटाला गेल्याने अनेक प्रभागांत क्रमांक दोनवर राहिलेल्या उमेदवारांना निसटता पराभव स्वीकारावा लागला आहे. हीच मते उमेदवारांच्या पारड्यात पडली असती, तर अनेक ठिकाणी निकालाचे चित्र बदलले असते. असे प्रमुख लढतींमधील मतांवरून दिसत आहे.



प्रभाग ५ : भाजपच्या अनुराधा गोफणे आणि राष्ट्रवादीच्या भीमाबाई फुगे यांच्यात चुरशीची लढत झाली. फुगे यांनी १३ हजार ५२३ मते घेत विजय मिळवला, तर गोफणे यांना १२ हजार ७८९ मते मिळाली आणि त्यांचा ७३४ मतांनी पराभव झाला. या जागेसाठी नोटाला ७५२ मते मिळाली.

प्रभाग ८ : भाजपचे सुहास कांबळे यांना १२ हजार ६१८ आणि राष्ट्रवादीच्या सीमा सावळे यांना १२ हजार ३६२ मते पडली. सावळे यांचा अवघ्या २५६ मतांनी पराभव झाला. नोटाला ६११ मते पडली. प्रभाग ११ : राष्ट्रवादीच्या सविता आसवानी अवघ्या २१ मतांनी विजयी ठरल्या. त्यांना ९ हजार ५२५, तर भाजपच्या माजी नगरसेविका जयश्री गावडे यांना ९ हजार ५०४ मते मिळाली. या जागेसाठी नोटाला पडलेली १ हजार ४२५ मते निर्णायक ठरली. येथील ‘ड’ जागेसाठी राष्ट्रवादीचे काळुराम पवार यांना ३१४ मतांनी पराभव स्वीकारावा लागला. पवार यांना ६ हजार ५५, तर भाजपचे मंदार देशपांडे यांना ६ हजार ३७० मते मिळाली. येथे नोटाला पडलेली मते ६२९ आहेत. प्रभाग २२ : भाजपच्या कोमल काळे यांना ९ हजार २९१ मते मिळाली, तर राष्ट्रवादीच्या उषा काळे यांना ८ हजार ६१८ मते मिळाली. उषा काळे यांचा ६७३ मतांनी पराभव झाला. नोटाला ९३३ मते मिळाली. प्रभाग २३ : राष्ट्रवादीच्या योगिता बारणे या ८ हजार ४६६ मते घेऊन विजयी झाल्या. त्यांना शेवटपर्यंत कडवी झुंज देणाऱ्या भाजपच्या सोनाली गाडे यांना ८ हजार २७ मते मिळाली. ७७१ मतदारांनी नोटाचे बटन दाबले आहे. ही मते गाडे यांना मिळाली असती, तर त्यांची एकूण मते ८ हजार ७९९ झाली असती. प्रभाग २७ : राष्ट्रवादीचे सागर कोकणे यांनी माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते यांचा अवघ्या ६०० मतांनी पराभव केला. कोकणे यांना १४ हजार ९६९, तर नखाते यांना १४ हजार ३६९ मते मिळाली. नोटाला पडलेली मते १ हजार ४०६ आहेत. प्रभाग ३० : राष्ट्रवादीचे राजू बनसोडे यांना रिपाइंचे उमेदवार मात्र भाजपच्या तिकिटावर लढलेल्या चंद्रकांता सोनकांबळे यांनी शेवटपर्यंत कडवी झुंज दिली. बनसोडे यांना ८ हजार ७९८, तर सोनकांबळे यांना ८ हजार ८७ मते मिळाली. या प्रभागात ७४२ मतदारांनी नोटाचे बटन दाबले. अवघ्या ७११ मतांच्या फरकाने बनसोडे यांनी सोनकांबळे यांचा पराभव केला. याच प्रभागात राष्ट्रवादीच्या प्रतिक्षा लांघी-जवळकर यांनी ९ हजार ४८१ मते घेत विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या माजी नगरसेविका उषा मुंढे यांना ८ हजार ९४७ मते मिळाली असून त्यांचा अवघ्या ५३४ मतांनी निसटता पराभव झाला. या जागेसाठी नोटाला १ हजार २१९ मते मिळाली. प्रभाग ३१ : भाजपचे ज्ञानेश्वर जगताप यांनी अवघ्या ५२३ मताधिक्याने विजय मिळवला. राष्ट्रवादीचे राजेंद्र जगताप यांनी कडवी झुंज देत ७ हजार ९८८ मते मिळवली, तर ज्ञानेश्वर जगताप यांना ८ हजार ५११ मते मिळाली. नोटाला पडलेली १ हजार ३६ मते आहेत. याच प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीप्ती कांबळे यांनी अवघ्या ७४५ मतांच्या फरकाने विजय मिळवला. त्यांना १० हजार ७३६ मते मिळाली, तर भाजपच्या दुर्गाकौर आदियाल यांनी तब्बल ९ हजार ९९१ मते मिळवली. या जागेसाठी १ हजार ५२८ मते नोटाला पडली आहेत. प्रभाग ३२ : राष्ट्रवादीचे अतुल शितोळे यांना अवघ्या २९० मतांनी पराभव स्वीकारावा लागला. भाजपचे प्रशांत शितोळे यांनी ९ हजार ९८६ मते घेऊन विजय मिळवला, तर अतुल शितोळे यांना ९ हजार ६९६ मते मिळाली. नोटाला ४५२ मते पडली.

# महापालिका सभागृहात डॉक्टर, वकील, अभियंते अन् शिक्षक


**पान - 1 वरून**

उच्चशिक्षण घेतलेल्या नगरसेवकांचाही सभागृहात लक्षणीय सहभाग आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पदवीधर नगरसेवकांची संख्या ३३ आहे. याशिवाय, एमए, एमकॉम, एमएस्सी, एमबीए, एमसीएसारखी पदव्युत्तर पदवी घेतलेले आठ नगरसेवक निवडून आले आहेत. महापालिकेच्या सभागृहात डॉक्टर, वकील, अभियंते आणि शिक्षक अशा व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या नगरसेवकांची उपस्थिती लक्षणीय आहे. नव्या सभागृहात एक डॉक्टर, तीन वकील, पाच अभियंते, आणि तीन शिक्षक आहेत. त्यामुळे आरोग्य, कायदा, शिक्षण आणि विकासकामांबाबत उच्चशिक्षितांकडून तज्ज्ञ मत मांडले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच चौथी पासपासून पदव्युत्तर आणि व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या नगरसेवकांचा समावेश असलेले हे सभागृह लोकशाहीतील व्यापक प्रतिनिधित्वाचे चित्र उभे करत आहे. विशेष म्हणजे दहावीपासून पदवीधर नगरसेवकांची संख्या सर्वाधिक म्हणजे ८१ आहे.

# अनेक अपघातानंतरही चालकांचा बेशिस्तपणा कायम

**पान - 1 वरून**

साने चौकात मोरे वस्ती, म्हेत्रे वस्ती तसेच चिखली - आकुर्डीकडून येणाऱ्या वाहनांमुळे दररोजच कोंडी होत असते. नेवाळे वस्ती ते घरकुल सोनवणे वस्ती मार्गे तळवडे आणि चिखली गावाकडे जाणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात कोंडी होते. वाहतूक नियंत्रक दिवे नाहीत. अनेकदा वाहतूक पोलिस असतानाही बेशिस्त वाहनचालक विरुद्ध दिशेने ‘नो एन्ट्री’ मधून वाहने घुसवून कोंडीमध्ये भर घालतात. नेवाळे वस्ती परिसरामध्येही कोंडी नित्याची बाब होऊन बसली आहे. देहू - आळंदी मुख्य रस्त्यावर सकाळ सायंकाळ तर दररोजच वाहनांच्या दोन-दोन किलोमीटर रांगा पाहावयास मिळतात. चिखली गाव येथील मुख्य रस्त्यावर वाहतूक नियंत्रक दिवे आहेत. मात्र, नियम पाळण्याची तसदी कोणीही घेत नाही. पाटीलनगर किंवा चिखली गावठाणाकडे जाण्यासाठी रहिवाशांना मोठी कसरत करावी लागते. याच रस्त्यावर अनेक भाजी विक्रेते अनधिकृतपणे हातगाड्या उभ्या करून वाहतूक कोंडीला हातभार लावत असतात.







# ‘उनकी जीत से ज्यादा.. हमारी हार के चर्चे..!’

## काळेवाडीत मच्छिंद्र तात्या तापकीरांनी शेवटच्या फेरीपर्यंत भाजपला घाम फोडला

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकीत काळेवाडी प्रभागात तीन जागांवर भाजप तर एका जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस विजयी झाली असली, तरी या निकालात सर्वाधिक चर्चा ‘ड’ गटातील भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस या थेट लढतीची होत आहे.



भाजपचे उमेदवार विनोद नढे विजयी ठरले असले, तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मच्छिंद्र तापकीर यांनी शेवटच्या फेरीपर्यंत दिलेल्या कडव्या झुंजीमुळे संपूर्ण प्रभागात राजकीय वातावरण तापलेले दिसून आले. त्यामुळे “उनकी जीत से ज्यादा; हमारी हार के चर्चे!” अशी भावना सर्वत्र उमटताना दिसत आहे. माजी नगरसेवक तसेच माजी विरोधी पक्षनेते असलेल्या मच्छिंद्र तापकीर यांना राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात उमेदवारी जाहीर केली. ऐनवेळी उमेदवारी मिळूनही तापकीर यांनी प्रचारात आक्रमक भूमिका घेत भाजपच्या विद्यमान नगरसेवक आणि उमेदवार विनोद नढे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे केले. तुल्यबळ उमेदवार असल्याने ही लढत अटीतटीची ठरणार, याचे संकेत प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात मिळाले होते.

मतमोजणीदरम्यान प्रत्येक फेरीत दोन्ही उमेदवारांमध्ये मताधिक्याचा चढ-उतार पाहायला मिळाला. सुरुवातीपासूनच शेकड्यांत फिरणारे मतांचे अंतर, शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहिल्याने भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही गोटांत प्रचंड अस्वस्थता होती. प्रत्येक मत मोलाचे ठरत असताना शेवटच्या फेरीत भाजपचे उमेदवार विनोद नढे यांनी आघाडी घेतली आणि अखेर अवघ्या १३०० मतांच्या फरकाने मच्छिंद्र तापकीर यांचा विजय निसटला. हा फरक आकड्यांमध्ये कमी असला, तरी त्याचे राजकीय अर्थ मोठे मानले जात आहेत. अनेक राजकीय अभ्यासक आणि स्थानिक मतदारांच्या मते, हा निकाल भाजपसाठी इशारा तर राष्ट्रवादी काँग्रेससाठी आगामी काळातील संधीचा स्पष्ट संकेत आहे. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या भाजपला या प्रभागात इतक्या चुरशीच्या लढतीला सामोरे जावे लागणे, ही बाब पक्षासाठी आत्मपरीक्षणाची असल्याचे बोलले जात आहे.

या निवडणुकीत मच्छिंद्र तापकीर यांनी स्थानिक पातळीवरील प्रलंबित प्रश्न, अपूर्ण विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव यावर आक्रमकपणे बोट ठेवले. त्यांच्या प्रचाराला तरुण, महिला तसेच स्थानिक कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. निकाल जाहीर झाल्यानंतरही “तापकीर हरले असले, तरी त्यांनी मनं जिंकली,” अशी चर्चा प्रभागात रंगताना दिसत आहे. काळेवाडीच्या राजकारणाची ही लढत पुढील निवडणुकांसाठी दिशा ठरवणारी ठरेल, हे मात्र निश्चित..!

# ‘पुणे ग्रॅंड टूर 2026’मुळे शहरातील मध्यवर्ती रस्ते 9 तास बंद

## प्रोलॉग रेसच्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालयांना सुट्टी; नागरिकांनी पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा प्रशासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित “पुणे ग्रॅंड टूर 2026” या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचे आयोजन 19 ते 24 जानेवारी 20 दरम्यान शहरात करण्यात आले आहे.

या स्पर्धेतील प्रोलॉग रेस सोमवारी (दि. 19) शहरात होणार असून, त्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने शहराच्या मध्यवर्ती आणि पश्चिम भागातील रस्ते तब्बल 9 तास बंद रहाणार असल्याचे आदेश जारी केले आहेत. या वेळी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा असे आवाहन वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे

त्याच बरोबर ही रेस ज्या रस्त्याने होणार आहे, त्या परिसरातील शाळा, महाविद्यालये, कॉलेज यांना देखील एकदिवशीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजीगनर घोले रोड, विश्रामबागवाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध, बाणेर, कोथरूड,बावधन, सिंहगडरोड, वारजे कर्वेनगर या पुणे महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील शाळा, महाविद्यालये यांना सुट्टी असणार आहे. पोलिस आयुक्तालयात पत्रकार परिषद पार पडली. त्यावेळी सह पोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त (पुर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील आणि पोलिस उप-आयुक्त (वाहतूक) हिंमत जाधव यांनी याबाबत माहिती दिली.

‘पुणे ग्रॅंड चॅलेंज टूर’च्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. 19) शहरातील प्रमुख भागांतील शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आदेश दिले आहेत. या स्पर्धेतील ‘प्रोलॉग रेस’ सोमवारी पुणे शहरात होणार आहे. त्यानिमित्त सकाळी 9 ते सायंकाळी 6 या वेळेत शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी पूर्णतः बंद राहणार आहेत. यामध्ये नामदार गोपाळकृष्ण गोखले (फर्ग्युसन महाविद्यालय) रस्ता, गणेशखिंड रस्ता, जंगली महाराज रस्ता (जे. एम. रोड) तसेच या मार्गांना जोडणारे उपरस्ते यांचा समावेश आहे.

वाहतूक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, या कालावधीत अनावश्यक प्रवास टाळावा. पर्यायी मार्गांचा वापर करावा व पोलिसांच्या सूचनांचे पालन करून स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य करावे.



### असा आहे स्पर्धेचा मार्ग!

- खंडोजी बाबा चौक ते गरवारे बीज ते गुडलक चौक मार्ग बंद
- गुडलक चौक ते तुकाराम पादुका चौक ते ज्ञानेश्वर पादुका चौक ते ललित महल चौक ते चाफेकर चौक मार्ग बंद
- चाफेकर चौक ते सूर्यमुखी दत्त मंदिर चौक ते रेंज हिल्स कॉर्नर येथे यू टर्न
- रेंज हिल्स चौक ते सूर्यमुखी दत्त मंदिर चौक ते चाफेकर चौक ते सिमला ऑफीस चौक ते संचेती चौक बंद मार्ग
- संचेती चौक ते स. गो. बर्वे चौक ते बालगंधर्व चौक ते डेक्कन जिमखाना बस डेपो

### या प्रमुख रस्त्यावरील वाहतूक बंद

- प्रोलॉग स्पर्धेदरम्यान सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत फर्ग्युसन कॉलेज रोड, गणेशखिंड रोड, जंगली महाराज रोड तसेच त्यांना जोडणारे उपरस्ते पूर्णतः वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहेत. या मार्गांवर अत्यावश्यक सेवेतील वाहने (रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलिस वाहने आदी) वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी राहणार आहे.

> स्पर्धेमुळे शहराची प्रतिमा जागतिक पातळीवर झळकणार आहे. हा स्वतःचा इव्हेंट समजून सहकार्य करा. सायकल स्पर्धेचा आंनद घेऊन स्पर्धा यशस्वी करा.
>
> - रंजन कुमार शर्मा, सह-पोलिस आयुक्त.

> या स्पर्धेचा एक टप्पा 23 जानेवारीला पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये असणार आहे. यामध्ये स्पर्धक 99 किलोमीटरचा टप्पा गाठतील, त्यातील 58 किलोमीटरचा भाग पुणे शहरातील असेल. यामुळे 23 तारखेलाही शहरांतर्गत वाहतूकीवर निर्बंध असतील. मात्र, वाहतूक टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येणार आहे. या दिवशी सुरवात बालेवाडीतून होऊन समारोप जंगली महाराज रस्त्यावरली झाशी राणी चौकात होणार आहे.
>
> - मनोज पाटील, अपर पोलिस आयुक्त.

# पुणे विद्यापीठात ‘नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस’चे दिमाखात उद्घाटन

## गणेशखिंड पोस्ट ऑफिसमधून तंत्रज्ञानाधारित, नागरिक-केंद्रित टपाल सेवांचा नवा अध्याय सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील गणेशखिंड पोस्ट ऑफिस येथे नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसचे उद्घाटन शनिवारी (दि.17) मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यापीठ परिसरात आधुनिक, तंत्रज्ञानाधारित व नागरिक-केंद्रित सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या प्रगत व नवोन्मेषी वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.

या उद्घाटन समारंभास राज्यसभेच्या खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी, महाराष्ट्र व गोवा सर्कलचे चीफ पोस्टमास्तर जनरल श्री. अमिताभ सिंग, पुणे क्षेत्राचे डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस श्री. अभिजित बनसोडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस अभिजित बनसोडे यांनी आपल्या भाषणात पोस्ट ऑफिसची आवश्यकता आणि त्यामागील रोडमॅप सविस्तरपणे स्पष्ट केला. या वेळी डॉ. विजय खरे यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा सक्रिय वापर करून त्याचा शैक्षणिक व वैयक्तिक जीवनात उपयोग करून घ्यावा, असे सांगितले.



### नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा वापर

- डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस अभिजित बनसोडे यांनी आपल्या भाषणात पोस्ट ऑफिसची आवश्यकता आणि त्यामागील रोडमॅप सविस्तरपणे स्पष्ट केला. या वेळी डॉ. विजय खरे यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिसच्या सेवांचा सक्रिय वापर करून त्याचा शैक्षणिक व वैयक्तिक जीवनात उपयोग करून घ्यावा, असे सांगितले.

या वेळी डॉ. मेधा कुलकर्णी यांनी नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस या संकल्पनेचे कौतुक करत टपाल विभाग आधुनिक व हायटेक होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. चीफ पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग यांनी, पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून जुना भारत आणि नवा भारत यांचा सुंदर संगम साधला जात असल्याचे सांगितले. विद्यापीठ परिसरात आधुनिक, तंत्रज्ञानाधारित व नागरिक-केंद्रित सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या प्रगत व नवोन्मेषी वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.

# वाघोलीचा पुण्यात डंका! रत्नमाला सातव यांनी मोडला मतदानाचा विक्रम

## वडगावशेरी मतदारसंघात रामभाऊ दाभाडेंच्या अनुभवाचा करिश्मा; अनुभवी आणि तरुण नेतृत्वाच्या हाती आता वाघोलीच्या विकासाची सूत्रे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेत वाघोलीचा समावेश झाल्यानंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीत प्रचंड मताधिक्य मिळवून वाघोलीच्या पहिल्या नगरसेवकांचा बहुमान रामदास दत्तात्रय दाभाडे, अनिल दिलीप सातव, रत्नमाला संदीप सातव यांनी मिळवला आहे. भाजप, आरपीआय मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार रामदास दाभाडे, अनिल दिलीप सातव यांनी प्रभाग क्रमांक तीनमध्ये दहा हजाराच्या पुढे मताधिक्य मिळवून विजय संपादन केला आहे.

तर प्रभाग क्रमांक चारमध्ये रत्नमाला संदीप सातव यांनी पुणे शहरातील सर्वात जास्त मते मिळवून महिलांमध्ये जास्त मताधिक्य मिळवण्याचा बहुमान मिळवला आहे. प्रभाग क्रमांक तीन आणि प्रभाग क्रमांक चारमध्ये वाघोलीची मतदार संख्या विभागली जाऊन दोन प्रभागांच्या मानाने कमी असताना देखील प्रचंड मताधिक्याने विजय संपादन केल्यामुळे भाजपच्या उमेदवारांच्या वाघोलीत मोठ्या प्रमाणात बोलबाला होऊ लागला आहे.




### अनुभवी व तरुण नगरसेवकांना पाठिंबा

» वाघोलीमधील पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी जिल्हा परिषद व ग्रामपंचायत या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांवर काम केले असून या निवडणुकीत जवळपास 25 वर्षे राजकीय अनुभव असणारे व्यक्तीला नागरिकांनी साथ दिली आहे. राष्ट्रवादीचे दिग्गज बंडू खांदवे यांचा दाभाडे यांनी पराभव केल्याने वडगावशेरी मतदारसंघात दाभाडे यांचे नाव मोठ्या प्रमाणात चर्चेला आले आहे.

पुणे महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या गावांमधून दोन मतदारसंघांना जोडलेला भाग असताना देखील वाघोलीचे तीन नगरसेवक पुणे महानगरपालिकेत नागरिकांचे प्रतिनिधित्व करणार असल्याने वाघोली चे महत्व पुणे मनपात मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत रत्नमाला संदीप सातव यांनी ४१ हजार पाचशेंच्या पुढे मतदान मिळवण्याचा विक्रम केला आहे. त्यांनी पंचायत समिती हवेलीच्या माजी सभापती तसेच माजी सरपंच वसुंधरा शिवदास उबाळे यांचा पराभव केला आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना संदीप सातव यांच्या कुटुंबीयांनी मिळवलेले यश सध्या वाघोलीत चर्चेत आले आहे.

वाघोलीमधील पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी जिल्हा परिषद व ग्रामपंचायत या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांवर काम केले असून या निवडणुकीत जवळपास 25 वर्षे राजकीय अनुभव असणारे व्यक्तीला नागरिकांनी साथ दिली आहे. राष्ट्रवादीचे दिग्गज बंडू खांदवे यांचा दाभाडे यांनी पराभव केल्याने वडगावशेरी मतदारसंघात दाभाडे यांचे नाव मोठ्या प्रमाणात चर्चेला आले आहे.

वाघोलीमध्ये भाजपचा प्रचार व प्रसार अखंडपणे करणाऱ्या अनिल दिलीप सातव या तरुण उमेदवाराकडे विकासाचे नवे पाऊल म्हणून वाघोलीकरांनी या उमेदवारला साथ दिली आहे. त्यांनी सुनील खांदवे यांचा पराभव केला आहे.

### पुण्यात सर्वाधिक मतदानाचा बहुमान

» पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत रत्नमाला संदीप सातव यांनी ४१ हजार पाचशेंच्या पुढे मतदान मिळवण्याचा विक्रम केला आहे. त्यांनी पंचायत समिती हवेलीच्या माजी सभापती तसेच माजी सरपंच वसुंधरा शिवदास उबाळे यांचा पराभव केला आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना संदीप सातव यांच्या कुटुंबीयांनी मिळवलेले यश सध्या वाघोलीत चर्चेत आले आहे.

"वाघोली, लोहगाव, खराडी, विमान नगर, सोमनाथ नगर आदी परिसराचा विकास करण्यासाठी पुणे महानगरपालिकेत दोन्ही मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी मताच्या रूपाने साथ देऊन वाघोली मधील तीन नगरसेवकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली आहे. आठ ही नगरसेवकांच्या साथीने दोन्ही प्रभागातील विकासाचा आलेख उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहू. वाघोलीबरोबरच इतर भागाचा विकास देखील झपाट्याने होणार आहे."

- डॉ. जयश्री राजेंद्र सातव पाटील, माजी सरपंच, वाघोली.

# शिक्रापूर-सणसवाडीत राष्ट्रवादीला खिंडार? महापालिका विजयानंतर 'हा' मोठा नेता भाजपच्या वाटेवर

## महापालिका निकालांनंतर भाजप कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले; राष्ट्रवादीतील 'इच्छुकांची' गर्दी आता भाजपच्या उंबरठ्यावर.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभर नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महत्त्वाच्या महापालिकांवर भारतीय जनता पक्षाने एकहाती सत्ता मिळवली आहे. या विजयामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांचे मनोबल उंचावले आहे. विशेष म्हणजे, शिक्रापूर-सणसवाडी जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचा एक मोठा नेता भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आता रंगू लागली असून,

यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत मोठे फेरबदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.




जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी नुकतीच सुरू झाली आहे. केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता असताना पुणे जिल्ह्यावर राष्ट्रवादीची पकड मानली जात होती. परंतु, महापालिका निवडणुकीच्या काळात राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी स्वतः पुणे जिल्ह्यात तळ ठोकला होता, तरीही पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला पराभवाचा सामना करावा लागला.

या निकालाने राजकीय चित्र पालटले असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी अनेक इतर पक्षांचे पदाधिकारी भाजपच्या तंबूत शिरण्यासाठी इच्छुक आहेत. शिक्रापूर-सणसवाडी या जिल्हा परिषद गटात सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. विद्यमान जिल्हा परिषद सदस्य कुसुम मांढरे आणि माजी पंचायत समिती सभापती मोनिका हरगुडे या दोघीही एकाच पक्षाकडून जिल्हा परिषदेसाठी इच्छुक आहेत.

पक्षाकडून उमेदवारी कोणा एकालाच मिळणार हे निश्चित असल्याने, डावलले जाणारे इच्छुक उमेदवार आता बंडखोरीच्या तयारीत आहेत किंवा दुसऱ्या सक्षम पक्षाच्या शोधात आहेत. महापालिकेतील भाजपच्या यशानंतर अनेकांच्या नजरा आता भाजपच्या उमेदवारीकडे वळल्या आहेत.

### निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाच...

» पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत अनेक विविध पक्षांतील पदाधिकाऱ्यांनी ऐनवेळी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यापैकी बहुतांश उमेदवार निवडून आल्याने राजकीय वर्तुळात आता 'निवडणूक जिंकायची असेल तर भाजपच' असा समज सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये आणि पदाधिकाऱ्यांमध्ये दृढ झाला आहे. यामुळेच जिल्हा परिषदेच्या रिंगणात उतरण्यापूर्वी अनेक बड्या नेत्यांचा कल भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याकडे वाढत असल्याचे दिसून येत आहे.